सांमधय IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

कोपरी पोलीस स्टेशन
सत्यमेव जयते
ठाणे शहर

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर  **P.S.(ठाणे):** कोपरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0329  **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/04/2024 13:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 05/04/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/04/2024

**Time From (वेळेपासून):** 13:10 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/04/2024  **Time (वेळ):** 11:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 021

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/04/2024 13:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आनंद सिनेमा परीसरात,ठाणे रेल्वे स्टेशन,कोपरी ठाणे पुर्व

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अशोक रमेश सोनावले
(b) **Father's Name** (वडील चे नाव) : रमेश
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 201, निषा बिल्डींग,प्रकती पार्क, ब्रम्हांड, ,घोडबंदर रोड, ठाणे , कासारवडवली ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 201, निषा बिल्डींग,प्रकती पार्क, ब्रम्हांड, ,घोडबंदर रोड, ठाणे , कासारवडवली ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9322174506

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविकुमार तुकाराम तेलवाडे | | | 1. पुष्पांजली फेज 2, बि विंग,, फ्लट नं 1304, ओवळा, घोडबंदर रोड, ठाणे पश्चिम, कासारवडवली ,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | धीरेंद्रकुमार सत्येंद्र मिश्रा | | | 1. 307, डी/3, महेश्वर,, पाईपलाईन रोड,,कशेली टोलनाका, भिवंडी,नारपोली , |

| | | | | ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
|---|---|---|---|---|

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी अशोक रमेश सोनावले, वय 38 वर्षे, व्यवसाय-होम डिलीव्हरी, रा.201, निषा बिल्डींग, प्रकृती पार्क, ब्रम्हांड, घोडबंदर रोड, ठाणे मोबाईल नंबर 9322174506 असा असून, तक्रार लिहून देतो की,
मी दिनांक 04/04/2024 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोनिरी संतोष अंबिके यांनी पुढील कारवाई करणेसाठी लागलीच दोन शासकिय पंच 1) श्री.लक्ष्मण हरी लोदी, वय 55 वर्षे, जवान, बक्कल क्रमांक 36, डी विभाग, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे 2) श्रीमती सुप्रभा अंकुश वाणी, वय 31 वर्षे, महिला जवान बक्कल नंबर 38, ए विभाग, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांना पाचारण केले. सदर वेळी पोनिरी संतोष अंबिके यांनी आमची पंचांशी व पथकाशी ओळख करून दिली. त्यानंतर मी लेखी स्वरूपात आणलेली तक्रार पंचांनी वाचून पाहीली असता, सदर तक्रारीमध्ये आशय पुढीलप्रमाणे होता. माझा मे.दृश्यंत एंटरप्रायसेस या नावाने चितळसर मानपाडा, घोडबंदर रोड, ठाणे याठिकाणी कार वॉशिंगचा व्यवसाय होता. त्याचा मी प्रोपायटर होतो. सन 2017 मध्ये आमचा ऊर्थ कंपनीशी झालेल्या तोंडी कॉन्ट्रक्टनुसार मी त्यांच्याच कंपनीच्या गाडया वॉश करीत होतो. त्यावेळी आमच्या एंटरप्रायजेसमध्ये 3 ते 4 कर्मचारी कामास होते. ऊर्थ कंपनीच्या अटीनुसार मी माझ्या कर्मचा-यांचा राज्य बीमा निगम, वागळे इस्टेट, ठाणे या सरकारी कार्यालयात विमा काढला होता व तो वेळोवेळी भरत होतो. कारवॉश व्यवसायामध्ये कर्मचारी कामावर सतत गैरहजर राहत असल्याने पहिल्या सहा महिन्यातच माझा व्यवसाय बंद झाला. व्यवसाय बंद झाल्याचे त्यावेळी मी राज्य बीमा निगम, वागळे इस्टेट, ठाणे कार्यालयास कळविले नाही. मी राज्य बीमा निगम कार्यालय ठाणे यांना न कळविल्याने व कर्मचा-याचा बिमा वेळोवेळी न भरून शासनाचे नुकसान झाल्याने राज्य बीमा निगम कार्यालय ठाणे कार्यालयाकडून दंड व व्याज असे एकुण 7,69,104/- रूपयाचा दंड आकारून मला नोटीस देण्यात आली. सदरचा दंड कमी करणेकरीता मी राज्य बीमा निगम कार्यालय, ठाणे येथे गेलो असता, तेथील अधिकारी धीरेनकुमार व रवी यांनी दंड किंवा कोणतीही कारवाई न करण्यासाठी माझेकडे 2,00,000/- रू. लाचेची मागणी करून, ती रक्कम दोन टप्प्यामध्ये करून, प्रथम 1,00,000/- रू. लाच देणेस सांगितले आहे. परंतु मला लोकसेवक यांना लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने मी दिनांक 04/04/2024 रोजी पोनिरी अंबिके यांच्याकडे लिहून आणलेली तक्रार दिली. त्यानंतर सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोनिरी अंबिके यांनी आम्हास व पंचास पडताळणी व सापळा कारवाईची माहिती दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाई करावयाची असल्याने मी माझा मोबाईल क्रमांक 9322174506 यावरून प्रथम लोकसेवक रवी यांचा मोबाईल क्रमांक 9594623164 यावर फोन करून, ते कोठे भेटणार आहेत असे विचारले असता, लोकसेवक रवी हे सदर वेळी कुर्ला येथे असल्याने त्यांनी दिनांक 05/04/2024 रोजी दुपारी 13.00 वा. दरम्यान मला ठाणे रेल्वे स्टेशन येथे भेटणार असल्याचे सांतिगले व फोन ठेवून दिला.
त्यानंतर पुढील सापळा कारवाई दिनांक 05/04/2024 रोजी करावयाची असल्याने पोनिरी अंबिके यांनी सापळा पथकास, मला व दोन्ही पंचास दिनांक 05/04/2024 रोजी सकाळी 12.00 वा. एसीबी कार्यालयात हजर राहणेसाठी व केलेल्या कारवाई बाबत गोपनीयता पाळण्याच्या देखील सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक 05/04/2024 रोजी मी, पंच व सापळा पथक असे एसीबी, ठाणे कार्यालयात पोनिरी अंबिके यांच्या केबिनमध्ये हजर झालो. लोकसेवक रवी हे ठाणे रेल्वे स्टेशन येथे भेटणार असल्याने पुन्हा एकदा त्यांना फोन करून विचारणा केली असता, त्यांनी ठाणे रेल्वे स्टेषन येथे दुपारी 13.00 वा. दरम्यान भेटण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना ठाणे रेल्वे स्टेशन पुर्व जवळील आनंद सिनेमा येथे भेटण्यास सांगितल्याने लोकसेवक रवी यांनी होकार दिला. त्यानंतर पोनिरी अंबिके यांनी लगेचच सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता व मार्गदर्शक सुचना करून, पडताळणी करण्याकरीता कोणास संषय येणार नाही असा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पोना/जगताप यांच्या मार्फतीने माझे आतील कपडयास लावून, मला माझी दुचाकी गाडी क्र. एमएच 14 एमयु 5011 वरून पंचासह लोकसेवक भेटणार असल्याचे ठिकाणी पाठविले. ती वेळ 13ः10 वा. होती. सदर ठिकाणी लोकसेवक रवी मिळून आले नाही. करीता मी माझा मोबाईल क्रमांक 9322174506 यावरून प्रथम लोकसेवक रवी यांचा मोबाईल क्रमांक 9594623164 यावर फोन करून, मी सदर ठिकाणी आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक हे पाच मिनीटात येणार असल्याचे त्यांनी मला सांगितले. त्यावेळी मी आनंद सिनेमाच्या बाजुलाच एक हॉटेल असल्याचे सांगून, तेथे लोकसेवकास येण्यास सांगीतले. लोकसेवक व माझी हॉटेल येथे भेट झालेनंतर प्रथम मी लोकसेवक रवी यांची पंच लोदी यांची ओळख करून देवून, ते काका असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक यांनी पंच काका यांना नमस्कार केला. त्यानंतर मी, पंच लोदी व लोकसेवक रवी असे हॉटेलमध्ये जावून बसलो. त्यावेळी लोकसेवक यांनी मला ''हं'' असे विचारले असता. त्यावेळी मी बोललो की, ''काकांकडे गेलो......काकांना परिस्थीती सांगीतली काय आहे काय नाही.......त्यांना काय हिशोब पटला नाय.....काकांना खोट वाटलं...'' त्यावर लोकसेवक ''हं'' असे बोलले. त्यानंतर पंच लोदी ''पैसे देणार किती'' त्यावर लोकसेवक रवी ''कसं आहे....त्यांची कंपनी होती ना...... दुषंत एंटप्रायजेस म्हणून....कसं आमचे हातात पण कमी असतं म्हणून .....आता... यांच हयाचेसाठी रेडी झालं कारण अँग्रेसिव आहे ते, चालत नाही..'' त्यानंतर लोकसेवक रवी बोलतात की, नाई आता किती देता ते सांगा तूम्ही..... त्यावर मी 'अं' त्यानंतर लोकसेवक ''कारण तुम्ही ......आता सोमवार पासून मग आमची प्रोसीडींग स्टार्ट होती......जर तूम्हाला करायची इच्छा नसेल तर......माझ्या हातात काही नाही.....तूमचा प्रष्न आहे...'' त्यावर मी ''कमीत कमी किती करु सांगा....एक दोन तासात काकांना....'' ''नई नई लगेच....काकाना.... बँकेतून वगैरे..... ते बोलले... पयले मला ....त्यांना माझेवर अविष्वास असल्याने मग.....'' त्यानंतर लोकसेवक ''दोन तूम्हाला सांगीतले होते......ओके .....दोन....'' त्यावर मी ''काका दोन लाख....दोन बोलला......दोन लाख रुपये....'' त्यानंतर लोकसेवक ''हां'' त्यावर मी '' बर तर आता....'' त्यानंतर लोकसेवक '' त्यांना तर सांगीतलंय ....आधी तर साहेब तीन बोलत होते......दोन पर्यंत आलो आम्ही.....एटीएम...एक हप्ता आता दया....बाकी दहा दिवसा नंतर दया....'' '' तूमचं किती म्हणणं आहे....आता किती देऊ षकता ...'' त्यावर मी ''आता मी यांना.....हयांनी नाई बोलले तर .....पन्नास एक हजार देतो बोलालेत....आता इनीषली........इमरजन्सीमध्ये....'' त्यानंतर लोकसेवक ''हं.'' त्यावर मी ''आता मी त्यांना सांगीतले की साहेबांना एक लाख सांगीतले ते आता अर्जंट मध्ये....'' त्यानंतर लोकसेवक ''आता पन्नास दया.......दहा एक दिवसानंतर पन्नास दया....'' त्यावर मी '' सर त्याच ते धीरेनकुमार सरांच काय करायचं....'' त्यानंतर लोकसेवक '' त्यांच तूम्ही टेन्षन घेवू नका.....आम्ही सगळं मिळून मिसळूनच करतो......तूम्हाला एक पण लेटर आलं का..... तूम्ही माझं गळा पकडू षकता....'' त्यावर मी '' नई नई......कारण मी स्वतः मी तूम्हाला ....काल पण मी त्यांना म्हणजे त्यांचे जे...'' त्यानंतर लोकसेवक '' अँकच्युली... मला पण वाषीला जायचं आहे.....माझी तिकडे सव्वा दोनची दुसरी आहे एक मिटींग .... नाई ..नाई....तिकडेचं थांबणार आहे...'' त्यावर मी '' तिकडेच......सव्वा दोन वाजेपर्यंत...'' त्यानंतर लोकसेवक '' नाई नाई .....कन्फर्म नाही.......सर अँक्च्युले हे तयार नव्हते....'' त्यावर मी '' ते तुमचं इंटरनल आहे.....तूम्ही मला मध्ये घेवू नका..... काकांच इषू असणार किंवा बाबांच....ते मला कषाला सांगताय.....तूमचा पर्सनल मॅटर आहे ना.....आता तूम्हाला....'' त्यावर पंच लोदी '' मी काय म्हणतो.....'' त्यावर मी'' बँकेत...बँकेतून वगैरे तोपर्यंत लगेच हे करु....'' त्यानंतर लोकसेवक '' बँक की एटीएम.......'' त्यावर मी ''एटीएम....आता पन्नास .....ते पंचवीस असतं ना...'' त्यानंतर लोकसेवक '' कुठली बँक आहे....'' त्यावर पंच लोदी ''एसबीआय'' त्यानंतर लोकसेवक ''एसबीआय इथे असेल आसपास....'' त्यावर मी ''नाई'' त्यावर पंच लोदी '' तिकडे पुढे..'' त्यावर मी'' चालेल मी..हे करुन घेतो..'' त्यानंतर लोकासेवक '' हं..'' त्यानंतर मी '' ते मला लई म्हणजे अच्क्युली........खुप टाईम.....'' त्यानंतर लोकासेवक '' मला फोनवरच सांगायचं ना....माझं टाईम वेस्ट नसता केला....'' त्यावर मी '' साहेब सा ॅरी...... त्या बदल्यात करतो मी....एक तासा भरात आहे ना ......तासा भरात तरी तासा भराच्या आतच होईल...'' त्यानंतर लोकसेवक ''तूम्ही वाषीला घेवून या....'' त्यावर मी'' वाषीला यायला लागेल....'' त्यानंतर लोकसेवक यास ठाण्यास यायला उषीर लागणार असल्याने मी लोकसेवकास तासाभरात येतो असे सांगितले. त्यावर लोकसेवक ''तासाभरात मग वाषीलाच'' नाईतर आम्ही पकडणार'' असे बोलले. त्यानंतर मी

ताराभरात येतो असे बोललो व ''काय पण करा ...मला अडचणीतून काढा.....पण तूम्ही...त्या दिवशी मी गेलो होतो ना.....धीरेन कुमार सर मला काय बोलले .....काय परिस्थिती आहे आता काय....हे होते....डायरेक्टली बोलले की, आरेस्ट वगैरे होऊ शकतं.......पण सरांनी आपल्याला मदत केली पर्सन लेवलवर...'' त्यानंतर लोकसेवक ''ज्युडीशल पॉवरर्स आहेत ना आमचे ऑफीसला...'' त्यावर पंच लोदी '' आता लगेच देऊ का...'' त्यानंतर मी ''सर देतायत ना...एक ताराभरात ,दोन तासात.'' पंच लोदी ''एक तासात'' त्यानंतर मी ''एक तासाच टाईम देतात..'' पंच लोदी '' तुम्ही बोलले अर्धे अर्धे...'' त्यावर लोकसेवक ''हं'' त्यानंतर मी ''कारण साहेबांनी मदत केली...नाहीतर..'' त्यानंतर लोकसेवक '' आपण मराठी असलो की करतो....स्टेट....बाकी गुजराती, मारवाडी असले आपण त्यांना जरा...हे करतो....इव्हन माझे इथे ओम प्रकाष पांडे होते.....ओम कन्सलटंसी....त्यांना जेल मध्ये टाकलं होतं आम्ही.....ज्युडीशल पॉवरर्स आहेत.....म्हणजे पोलीस किंवा....हे....मध्ये आम्ही घेतच नाही .....डायरेक्ट करु शकतो....'' '' मला वाशी ला पण जायचं आहे ना....'' त्यानंतर मी '' मी लगेच हे करतो.... ह्यांना जाऊन....ह्यांना जाऊन लगेच येतो ....डायरेक्ट जाऊन '' त्यावर लोकसेवक ''तूम्ही फोन करा...'' त्यानंतर मी ''लगेच करतो....मी लगेच....पटकन हे करतो.....थोडसं वेळ दया.... म्हणजे.... वेळ म्हणजे जाऊन लगेच येतो'' सदरचे संभाषण झालेनंतर लोकसेवक तेथून निघुन गेले.

त्यानंतर पो.निरी.अंबिके यांनी आम्हा पंचांसमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवरील मेमरी कार्डावर ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण लक्षपुर्वक ऐकले असता, यावरून लोकसेवक रवी यांनी माझेकडे प्रथम पन्नास हजार रूपये व दहा दिवसानंतर पन्नास असे बोलून, एकुण एक लाख रूपये लाचेची मागणी करून, मी धिरेनकुमार साहेबांच काय असे बोलले असता, आम्ही मिळून मिसळून काम करतो असे बोलून सदर लाचेच्या रकमेमध्ये धिरेनकुमार साहेबांचा देखील सहभाग असल्याचे पडताळणीमध्ये स्पश्टपणे निश्पन्न झालेले आहे.

त्यामुळे लागलीच पोनिरी अंबिके यांनी लोकसेवक यांचेविरुध्द लाचेचा सापळा आजमाविण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. परंतू माझेकडे पन्नास हजार रूपये एवढी मोठी रक्कम नसून, 2000/- रू. असल्याचे सांगितले. त्यावेळी पोनिरी अंबिके यांनी 2000/- रू. व उर्वरीत बनावट नोटा वापरून सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर पुढील कार्यवाही आली व पैशाचे काम झाले आहे असे प्रथम लोकसेवक रवी यांस फोनव्दारे कळविले असता, लोकसेवक रवी यांनी मला ठाणे रेल्वे स्टेशन पुर्व आनंद सिनेमा येथे बोलविल्याने पोनिरी अंबिके यांनी लगेचच सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता व मार्गदर्शक सुचना करून, मला दुचाकी वाहनाने पंच लोदी यांचेसह पाठविले. सदर वेळी लोकसेवक रवी आनंद सिनेमा येथे दिसून न आल्याने मी लोकसेवक रवी यास फोन केला असता ते ऑन द वे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर थोडयाच वेळात लोकसेवक रवी हे आनंद सिनेमा येथे आले व त्यांनी लागलीच लाचेची रक्कम स्विकारणेसाठी त्यांच्याकडे असलेल्या काळ्या बॅगेत सदर लाचेची रक्कम ठेवून देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी लाचेची रक्कम लोकसेवक रवी यांच्याकडे असलेल्या काळ्या बॅगेमध्ये ठेवून दिली. त्यानंतर मी सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केल्यानंतर सापळा पथकाने लोकसेवक रवी यास रंगेहाथ पकडले व पोनिरी अंबिके यांनी स्वतःची ओळख देवून, त्यांना त्यांचे नाव व हुद्दा विचारले असता लोकसेवक यांनी त्यांचे नाव रविकुमार तुकाराम तेलवाडे, सामाजिक सुरक्षा अधिकारी वर्ग-3, कर्मचारी राज्य बिमा निगत उप क्षेत्रीय कार्यालय, ठाणे रा. पुश्पांजली फेज 2, बि विंग, फ्लॅट नं. 1304, ओवळा, घोडबंदर रोड, ठाणे पच्छिम असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर सदर लाचेच्या रकमेमध्ये त्यांचे वरिश्ठ अधिकारी धीरेंद्रकुमार यांचा देखील सहभाग असल्याने, पोनिरी अंबिके यांनी लोकसेवक रवी यास त्यांना फोन करून पन्नास हजार लाचेची रक्कम स्विकारली असलेबाबत सागण्यास सांगितले. त्यावेळी लोकसेवक रवी यांनी लागलीच त्यांचे वरिश्ठ अधिकारी धीरेंद्रकुमार यांना फोन करून सदर पन्नास हजार रूपये दिले असलेबाबत सांगितले असता, त्यावर धीरेंद्रकुमार बोलले की, ''कम नही लग रहा है वो हाफ, कम लग रहा है वो पर्सेनटेजमे'' '' तो थोडा खिंचो ना थोडा'' '''खिंचे पाओगे वन तक...वन तक खिंच'' असे बोलले असता लोकसेवक हं असे बोलले. त्यावर धीरेन्द्रकुमार ''वन तक करो'' असे बोलून सदर स्विकारलेली लाचेची रक्कम घेवून वागळे इस्टेट येथील कार्यालयात येण्यास सांगून, त्यांचा देखील लाचेच्या रकमेमध्ये सहभाग असल्याचे दिसून आलेले आहे. करीता लागलीच पोनिरी अंबिके यांनी शासकिय वाहनाने सापळा पथक व लोकसेवक रवी यांचेसह धीरेंद्रकुमार यांचे कार्यालयातील दुसरा मजल्यावर असलेल्या केबिनमधून त्यांना ताब्यात घेण्यात आले. सदरवेळी पोनिरी अंबिके यांनी स्वतःची ओळख देवून त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव धीरेंद्रकुमार सत्येद्र मिश्रा, वय 40 वर्शे, सहाय्यक निदेषक, वर्ग-2, कर्मचारी राज्य बिमा निगम, उप क्षेत्रीय कार्यालय, ठाणे रा.307, डी/3, महेश्वर, पाईपलाईन रोड, कशेली टोलनाका, भिवंडी असे असल्याचे सागितले व पोनिरी अंबिके यांनी त्यांच्या वरिष्ठांना देखील कळविलेले आहे.

तरी माझा कार वॉशिंगचा व्यवसाय बंद झालेबाबत मी राज्य बीमा निगम कार्यालय ठाणे यांना न कळविल्याने व

कर्मचा-याचा बिगा वेळोवेळी न भरून, पारानाचे नुकसान केल्याने राज्य बीमा निगम ठाणे कार्यालयाकडून मला दंड व व्याज असे एकुण 7,69,104/- रूपयाचा दंड आकारून, नोटीस देण्यात आल्याने, सदरचा दंड व कारवाई न करणेसाठी यातील लोकसेवक रवीकुमार यांनी माझेकडे दोन लाख रूपये लाचेची मागणी करून, तडजोडीअंती प्रथम पन्नास हजार व दहा एक दिवसांनंतर पन्नास हजार असे एकूण एक लाख रूपयाची मागणी करून, पैकी पन्नास हजार रूपयांचा पहिला लाचेचा हप्ता स्वतःसाठी व वरिष्ठ अधिकारी यांचेसाठी स्विकारून, त्यांचे वरिश्ठ अधिकारी श्री. धीरेन्द्रकुमार यांना फोनवरून माझी लाचेची रक्कम 50 हजार रूपये स्विकारले असलेबाबत सांगितले असता, धीरेन्द्रकुमार यांनी एक लाख तक खिच असे बोलून, स्विकारलेली लाचेची रक्कम त्यांच्या वागळे इस्टेट येथील कार्यालयात घेवून बोलावून, सदर लाचेच्या रकमेमध्ये वरिष्ठ अधीकारी धीरेन्द्रकुमार यांनी देखील सहभाग दर्षवून, प्रोत्साहन दिल्याचे निश्पन्न झाल्याने माझी लोकसेवक रवीकुमार तुकाराम तेलवाडे व धीरेद्रकुमार सत्येद्र मिश्रा यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

RANJIT SAKHARAM DERE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**